# प्रेस नोट

दिनांक २१/०२/२०१९

| | |
|---|---|
| युनिट | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.भरतसिंह मनोहरसिंह चव्हाण, वय–५३ वर्ष, पद–प्रभारी अग्नीशमन अधिक्षक, अग्निशमन विभाग, मनपा अमरावती (अग्निशमन मुख्यालय, वालकट कंपाउंड, अमरावती.) रा.कांती कॉलनी, सातुर्णा अकोली रोड, आय.सी.ए. भवनच्या मागे, अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०००/–रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०००/–रु. |
| घटनास्थळ | अग्निशमन मुख्यालयाचे आवार, वालकट कंपाउंड, अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि.२१/०२/२०१९ चे १६:०१ वा. |

**थोडक्यात हकीकत** :– यातील तक्रारदार यांनी दि.२०/०२/२०१९ रोजी तक्रार दिली की, त्यांची फायर सर्विसेसची फर्म असून ते मनपा अमरावती क्षेत्रात येणाऱ्या इमारतींना फायर सेफटीचे साहित्य पुरवितात व इमारतींना अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता फाईल अग्निशमन विभाग, मनपा अमरावती येथे सादर करतात. त्यांनी सादर केलेल्या दोन हॉस्पीटलच्या फाईलवर सही करुन अग्निशमनचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी अग्निशमन विभागाचे अधिक्षक श्री.भरतसिंह चव्हाण यांनी त्यांना प्रत्येक फाईलचे २५००/–रु. प्रमाणे ५०००/–रु. लाचेची मागणी केली अशी लेखी तक्रार त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो येथे दिल्यावरुन दि. २०/०२/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे श्री.चव्हाण यांनी तक्रारदार यांना दोन्ही हॉस्पीटलचे ना हरकत प्रमाणपत्र दिले म्हणून तक्रारदारास यापुर्वी ५०००/–रु. मागणी केल्याचे कबूल करुन त्यानंतर पंचांसमक्ष ४०००/–रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/–रु लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.

दि.२१/०२/२०१९ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे चव्हाण यांना तक्रारदाराकडून ३०००/–रु लाच रक्कम पंचांसमक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे तसेच त्यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राजवंत आठवले, नापोकॉ श्री.प्रमोद धानोरकर, पोलीस शिपाई श्री.राजेश कोचे, श्री.पंकज बोरसे तसेच चालक नापोकॉ श्री.अकबर यांनी यशस्विरीत्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :– अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. :– १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

( राजवंत आठवले )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned by CamScanner